# मंडळी

## देवाचे निवडलेले लोक

## १ ले पेत्र २ :९ –१०

सखोल वाचनाकरीता १ ले पेत्र २:१–१२
अवांतर शास्त्रभाग – निर्गम १९:१–६, होशेय १२ योहान ३:१–१७

**प्रस्तावना**

ऑक्टोबर १३,१९०८ टेक्सास प्रांतातील हिरवळीवर उभारलेल्या विस्तृत मंडपामध्ये असामान्य दृष्टांताने आकार घेण्यास सुरुवात केली. संदेश, प्रार्थना, आपसात चर्चा, विचारांची देवाण घेवाण ह्यामध्ये काही दिवस घालविल्यानंतर अमेरिकेतील दूरदूरच्या तसेच आजुबाजूच्या ठिकाणावरुन आलेल्या प्रतिनीधींनी एक ठराव संमत करुन तो सार्वमताने स्विकारला. सर्वांची अंतःकरणेआनंदाने भरली. प्रत्येकजण परमेश्वराचे गौरव करी गीत गात मंडपाच्या बाहेर त्याच्या सभोवती फिरु लागला. मोठ्या संख्येने आलेल्या ह्या लोकांत एकता निर्माण झाली.

एका परिणामकारक संदेशामुळे त्यांच्यात एकता निर्माण झाली. वेस्लीप्रणीत पवित्रेतेच्या सिद्धांतावर भर देणाऱ्या ह्या समुहात वेगवेगळ्या मंडळ्यांचे व संस्थांचे मिळून १००० प्रतिनीधी सामील झाले.

आकाराने लहान असलेल्या ह्या वेगवेगळ्या मंडळ्यांचे कार्य अमेरिका व कॅनडापुरतेच मर्यादित न रहाता या मंडळ्यांचे सभासद मिशनरी ह्या नात्याने भारत , केपवर्दे, जपान, आफ्रिका, मेक्सिको तसेच चिन देशात कार्य करीत होते व तेथे त्यांनी मंडळ्यांची स्थापना केली.

वेस्लीप्रणीत पवित्रतेचा संदेश व शिक्षण देण्याची तळमळ असणाऱ्या कार्यकत्यांनी व सेवकांनी, विश्वव्यापी सेवा कार्यासाठी पायलट पॉइंट सोडले.

टेक्सास च्या हिरवळीवर शंभर वर्षा पूर्वी स्थापन झालेल्या ह्या मंडळीत आज १६ लाखांपेक्षा अधिक सभासद संख्या असून एकुण १२० भाषेतुन, १५१ देशात सेवाकार्य चालु आहे. एकापासून अनेक झाले.

एकट्याने नव्हे तर सर्वांच्या संयुक्त प्रयत्नात अधिक सामर्थ्य आहे हे विश्वासणाऱ्यांच्या ह्या जीवन समुहाने त्वरीत ओळखले. आपली स्वतःची वेगळी ओळख अशी निर्माण करण्याच्या कामी आता ते लागले. ते नॅझरीन होते. पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शक नेतृत्वावर त्यांचा विश्वास होता. सुवार्ताप्रसार व दयार्थ सेवा हा त्यांचा प्रमुख हेतू होता. तसेच पवित्रतेचा संदेश देण्याविषयी त्यांच्या मनात उत्कट इच्छा होती. ह्या महान कार्यातील उदभवणाऱ्या अडचणींची त्यांना कल्पना होती.

फारच थोड्या अवधीत जागतिक महायुद्धाला सुरुवात झाली. धैर्यवान सेवक युद्धजन्य स्थितीत देखील जीवघेणा धोका पत्करुन कार्य करीत होते. जगभर मंदीची लाट आल्यामुळे आर्थिक स्थिती ढासाळली होती, परिणामी वाढीस लागलेल्या तरुण मंडळीला अडचणींना तोंड द्यावे लागले.

मंडळीची खूप मोठी वाढ म्हणजे, संकटात साधनांचा सहज पुरवठा ही कल्पना चूकीची आहे हे त्यांच्या त्वरीत लक्षांत आले.

दुसऱ्या महायुद्धात काही मिशनऱ्यांना परदेशात कैद करण्यात आले. परिणामी अनेक देशात मिशनरी कार्य थांबले, असे असले तरी मंडळीचे सेवाकार्य खंडीत न होता तीची वाढ होतच राहीली. जागतिक तणावाच्या स्थितीत देखील मंडळ्यांचे कार्य, शाळा व दवाखान्यांची स्थापना सुरुच राहीली असतांनाच मंडळीची वैश्वीकवाढ देखील होत राहीली.

दुसऱ्या महायुध्दानंतर अमेरिकेतील मंडळ्यांची अभुतपूर्व वाढ झाली. शेकडो मंडळ्यांची स्थापना झाली, नवीन डिस्ट्रीक्टस्ची निर्मीती करण्यात आली. कॉलेजेसची संख्या वाढली, नॅझरीन कॉलेज कोलोरॅडो स्प्रिंग, नॅझरीन थिऑलॉजीकल सेमेनरी, कॅन्सस सीटी यांची स्थापना झाली.

झपाट्याने वाढणाऱ्या ह्या मंडळ्यांनी जागतिक मिशन कार्याकरीता सेवक तसेच मोठ्या प्रमाणात पैसा पुरविला. जागतीक स्तरावरील नॅझरीन मंडळ्यांचे कार्य वाढू लागले व जवळपास १००० सेवक मिशनरी कार्यात गुंतले.

सुवार्ता प्रचार कार्य इतके परिणामकारक रीतीने चालू होते की जागतिक स्तरावरील आमच्या कार्याच्या पहिल्या शतकाच्या पुर्वार्धात मंडळ्यांची सभासद संख्या इतकी वाढली की ती अमेरिकेच्या व कॅनडातील सभासद संख्येपेक्षा देखील अधिक झाली.

ज्या आवेशाने चर्च ऑफ द नॅझरीन मंडळी अनेकातून एक अशी निर्माण झाली ती केवळ पवित्रतेच्या संदेशाने प्रेरीत ' ख्रिस्त सदृष्य शिष्य'' जगात निर्माण करण्याकरीता.

१९०८ ला मंडळीत ऐक्य निर्माण करण्यासाठी कारणीभूत ठरलेला घटक म्हणजे पवित्रतेचा संदेश. विश्वास आणि आज्ञापालनातून भावी आशेचा दैदिप्यमान अनुभव म्हणजे पवित्रतेचा संदेश होय.

आम्ही सर्वजण ह्या भुतलावर विखुरलेले लोक मोठ्या आत्मियतेने सुवार्ताप्रसार, शिष्यत्वाचे शिक्षण आणि दयार्थ सेवा अशा वेगवेगळ्या सेवांमध्ये व्यस्त असलो तरी एक आहोत हे ह्या संदेशाने प्रकट होते. परंतु ह्या संदेशाची निर्मिती आमच्यातून झालेली नाही, आणि संदेश आमच्यात समावल्या देखील जाऊ शकत नाही.

प्रभू येशूचा उतावळा शिष्य शिमोन पेत्र ह्याने आशिया मायनर, आताचा तुर्कस्थानचा प्रदेश ह्यामध्ये पांगलेल्या ख्रिस्ती लोकांकरीता लिहीलेली नवीन करारांतील दोन पत्रे वाचा.

पेत्राने विश्वासणाऱ्यांना आवाहन केले की येणाऱ्या संकटात तुम्ही तुमची अढळता, परिणामकारकता व संदेश दृढ धरुन राहावे.

पेत्राने , त्यांना आपल्या ''खऱ्या ओळखीची '' जाणिव ठेवण्यांची आठवण करुन दिली. ते नवे इस्राएल होत. जुन्या करारात देऊ केलेल्या देवाच्या सर्व अभिवचनांशी ख्रिस्ताद्वारे त्यांचा थेट संबंध जोडला आहे. ते देवाचे नविन लोक होत.

## १. <u>निवडलेले लोक</u>

पेत्राने आपल्या वाचकांना ही गोष्ट स्पष्ट केली की त्यांच्या स्वतःच्या पुढाकाराने ते देवाचे लोक झालेले नाहीत. त्याने म्हटले की '' तुम्ही निवडलेले लोक आहात, तुम्ही कृपेने घडविलेले आहात.''

त्यांच्या स्वतःच्या अस्तित्वाचे व देत असलेल्या संदेशाचे ते उगम नव्हत, देवाने त्यांना त्याचे लोक होण्याकरीता स्वतः बोलावले. त्याच्या संदेशाच्या सुरुवातीलाच पेत्र म्हणतो की तुम्हाला देवाने निवडलेले आहे (१ पेत्र १:२)

देवाने त्यांच्यासाठी केलेली तरतूद अशी होती की, '' आत्म्याच्या द्वारे झालेल्या पवित्रतेने ते घडविल्या गेले''. हे पत्र ज्यांना पेत्राने लिहीले त्या विश्वासणाऱ्यांकरीता हे असामान्य सत्य अनेक पिढ्यांपासून चालत आलेली ठेव होती. जो पुढाकार घेणारा, आमच्या पापापासून मुक्तीचा आरंभ करणारा त्याने आम्हाला निवडले आहे. चर्च ऑफ दी नॅझरीनच्या शताब्दी महोत्सवात हा आत्मविश्वास आम्हाला सामर्थ्य व महत्व प्राप्त होण्यास कारणीभूत ठरतो.

त्याने आमची निवड केली, आम्हाला पाचारण केले, अनुग्रहाची प्रजा होण्याकरीता आमची निर्मिती केली अशी आम्हाला खात्री आहे. त्याची दया व क्षमा ह्यामुळे येशू ख्रिस्तावरील आज्ञापालनाच्या द्वारे त्याने आम्हाला एकमेकांच्या संपर्कात आणून कराराचा समाज बनविले.

मनाची पकड घेणारे सत्य ह्या ठिकाणी पेत्रने व्यक्त केले ते असे की, तुम्ही जे पूर्वी लोक नव्हता ते आता तर देवाचे लोक आहा.(१ पेत्र २:१०) हे सत्य आमच्या एकट्या पुरतेच मर्यादित नसून, जे त्याच्या कृपेच्या पुढाकाराला प्रतिसाद देतात अशा सर्वाकरिता एक विलक्षण परंपरा होय.

आपल्या जवळ घेण्यासाठी त्याने सर्व लोकांना आमंत्रण दिले आणि ज्यांनी येशू ख्रिस्ताला खरोखर आपला तारणारा म्हणून स्विकारले आहे, अशा कराराच्या प्रजेशी आम्ही सलग्न झालो ही सत्यता तुम्हाला माहीत आहे काय ? देवाच्या अद्भूत पापक्षमेचा व दयेचा तुम्ही कधी अनुभव घेतला का ? त्याच्याशी तुमची ओळख व्हावी हाच आमच्या संदेशाचा अंतस्थ हेतू होय.

आज आत्ताच येशू ख्रिस्ताबरोबर तुमची व्यक्तीगत ओळख होऊ शकते.
आमच्या वरील त्याच्या दयेमुळे तो आम्हाला अंतःकरणापासून त्याच्याजवळ येण्यासाठी आमंत्रण देत आहे. येशू ख्रिस्ताचे यातनामय मरण हे देवाच्या आमच्यावरील प्रेमाचे मोजमाप दर्शविते, तुम्ही त्याला ओळखता का?

त्याला ओळखू इच्छीता काय? तुम्ही देखील ह्या लोकांच्या सोबत देवाचे लोक होऊ शकत.। त्याची तुम्हाला गरज आहे हे ओळखा, तुमच्या पापांची त्याला कबुली द्या, पातकांपासून मागे फिरा, आताच पुर्णपणे त्याच्यावर विश्वास ठेवा.

हे पत्र पांगलेल्या, सर्वदूरवर एकाकी पडलेल्या लोकांना, त्यांच्या विपरित परिस्थितीत धीर देऊन विश्वासात खंबीर करण्याकरीता पेत्राने लिहीले.

तुम्ही आता एकटे नव्हत तुम्ही देवाचे स्वतःचे लोक आहात.

## २. <u>पवित्र लोक</u>

''निवड झालेले '' ह्या महत्वपूर्ण बाजूवर पेत्र जोर देवून सांगत आहे की, तुम्ही पवित्र राष्ट्र आहा (१ ले पेत्र २:९) इस्त्राएलाला प्राप्त झालेल्या परंपरेचे लागूकरण ज्यांना पत्र लिहीले त्यांच्याशी करीत पेत्र म्हणाला, तुम्ही येशू ख्रिस्ताच्या आज्ञेत राहावे म्हणून देव जो पिता ह्याने स्वतः तुमची निवड करुन तुम्हास पवित्र आत्म्याच्या द्वारे शुद्ध केले ही तुमची ठेव होय, हेच तुमचं भवितव्य, तुम्ही तर देवाचे पवित्र लोक आहांत. इस्त्राइल लोकांना त्याने पत्राच्या सुरुवातीला देखील ह्या परंपरेसंबंधी आवाहन केले–. हाच बोध त्याने आपल्या वाचकांना देखील अनुलक्षूण केला आहे. '' तुम्ही आज्ञांकींत मुले व्हा आणि अज्ञानावस्थेतील आपल्या पूर्वीच्या वासनाप्रमाणे वागु वर्तू नका, तर ज्याने तुम्हास पाचारण केले, तो जसा पवित्र आहे, तसे तुम्हीही सर्वप्रकारच्या आचरणांत पवित्र व्हा. कारण मी पवित्र आहे यास्तव तुम्ही पवित्र व्हा ''. १ ले पेत्र १:१४–१५ मध्ये ज्या पवित्रीकरणाकडे पेत्राने त्याच्या वाचकांचे लक्ष वेधले तीच चर्च ऑफ द नॅझरीन ची परंपरा होय. पवित्रीकरणाच्या हे पाचारण आम्ही जाणीवपूर्वक अंगीकारले आहे. आमच्या सिद्धांताच्या कलमात त्यास अग्रक्रम देण्यात आला आहे. आमच्या संदेशातून देखील ह्याच गोष्टीवर आम्ही भर देतो. हाच विषय आमच्या रोजच्या जीवनाच्या केंद्रस्थानी आहे.

संघटना ह्या नात्याने आम्ही '' नॅझरीन '' हे नाव धारण केलेले असले तरी आम्हाला पवित्रजन होण्यासाठी पाचारण केले आहे. पवित्र आत्म्याने प्राप्त अंतःकरण शुद्ध झाल्यानंतर जीवनातील पवित्रता टिकवण्यासाठी येशू ख्रिस्ताच्या आज्ञेत आम्ही सतत असले पाहिजे. ह्या आज्ञापालनात प्रेम आणि दया, करुणा व आपलेपणा आहे.

हे आज्ञापालन म्हणजे येशू ख्रिस्ताला आपला प्रभू मानुन त्वरीत शरण जाणे, आत्म्याच्या द्वारे युक्त होणे, सर्वप्रकारच्या लोकांवर आपल्या मनापासून प्रेम करणे. ह्या आज्ञापालनात लोकांच्या गरजा समजून घेऊन त्यांच्या सेवाकार्यात सतत व्यस्त राहणे होय. ह्या संबंधी मी तुम्हाला काही सांगू इच्छीतो पवित्रतेचे कृपादान, संपूर्ण पवित्रकरण हे केवळ सिद्धांताच नाहीत तर नॅझरीन मंडळीच्या लोकांसाठी ही एक अनिवार्य बाब असून त्याप्रकारे वागणे व बोलणे हा त्यांचा इतिहास आहे. त्या करीताच आम्ही जगतो.

पण विचारायचा प्रश्न हा आहे की, काय ह्या अद्भूत कृपेचा अनूभव तुम्ही घेतला का ? (त्याच्या समीप जाऊन प्रतीरुप होण्यासाठी?) देवाच्या आत्म्याला तुमच्या अंतःकरणात कार्य करु दिले का? तुमच्या जीवनात आत्म्याची परिपूर्ती होण्यासाठी संपूर्ण समर्पणाप्रत तुम्ही आलांत कां ?

तो तुमच्या अंतःकरणाची शुद्धता करु इच्छितो. स्वतःचं समर्पण करण्यासाठी तो तुम्हाला ह्या क्षणी आमंत्रण देत आहे. हीच तुमच्या विषयी असलेली त्याची इच्छा आहे.

त्याच्यापासून (देवापासून) असलेल्या परिपूर्णतेची तुम्ही अपेक्षा बाळगाल का ? मुक्ती मिळालेलं जीवन इतर कोणाच्याही अधिकारात न राहू देता त्याला संपूर्ण समर्पण कराल का?

अंतःकरणातील अगदी खोल कप्पांत देखील तुम्ही त्याला अधिकार देणार का?

त्याच्यावर विश्वास ठेवा, त्याच्या आत्म्याने तो तुम्हाला भरु इच्छितो.

आमच्या मंडळीची चालत आलेली ही परंपरा होय. कराराचे विश्वासूजन (लोक ) म्हणून आम्ही वर्ततो. आमच्या संयुक्त व वैयक्तीक प्रयत्नाने देवाच्या सामर्थ्याच्या व पवित्रतेच्या अनुभवाप्रत आम्ही जाऊ शकतो. प्रारंभापासूनच हा संदेश चर्च ऑफ द नॅझरीनच्या मिशनरी कार्याच्या केंद्रस्थानी राहीला. जगाला आम्ही सुवार्ता सांगतो ह्या करीता की, विश्वासणाऱ्यांचे जीवन पूर्णपणे बदलून पवित्र देव जो की, आम्हाला पूर्ण शुद्ध करु इच्छितो त्याच्याद्वारे त्यांचे देखील पवित्रीकरण व्हावे.

३. **<u>पाठविलेले लोक</u>**

पेत्राने म्हटले की आम्ही निवडलेला वंश, राजकीय याजक, पवित्र राष्ट्र, देवाचे स्वतःचे लोक आहोत यासाठी की ''ज्याने तुम्हांस अंधकारांतून काढून आपल्या अद्भूत प्रकाशांत पाचारण केले त्याचे गुण तुम्ही प्रसिद्ध करावे. '' (२:१) आम्ही पाठविलेले लोक आहोंत. आम्ही पाठविलेले लोक आहोत म्हणून आमच्या जवळ असलेली ठेव आमच्या स्वतःच्याच भल्यासाठी नाही. त्याची महकृत्ये जाहीर करण्यासाठी आमची निवड झालेली आहे. आमची झालेली निवड, मुक्ती, परिवर्तन आणि पवित्रीकरण ह्यामुळे आम्ही ''पाठविले'' आहोत. ही निवड फक्त आमच्याच करीता आहे असे नसून ती पूर्ण जगासाठी आहे. त्याच्या दुसऱ्या पत्रात पेत्राने ही गोष्ट सखोल स्पष्ट केली आहे. कित्येक लोक ज्याला विलंब म्हणून म्हणतात तसा विलंब प्रभू आपल्या वचनाविषयी करीत नाही. तर तो तुमचे सहन करीतो. कोणाचा नाश व्हावा अशी त्याची इच्छा नाही तर सर्वांनी पश्चाताप करावा अशी आहे. (२ पेत्र ३:१) शक्य आहे की येशूने निकदेमसाच्या सोबत झालेल्या संभाषणाची कल्पना आपल्या शिष्यांना दिली, योहानाने त्याच्या पुस्तकाच्या तिसऱ्या अध्यायात ती लिहून ठेवली. येशूच्या मनात हरवलेल्या विषयी असलेल्या कळकळीची जाणीव स्वाभाविकच पेत्राला झाली.

देवाने जगावर इतक भरपूर प्रेम केलं की त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला हा पुत्र कोणाचाही नाश होऊ नये असे इच्छीत होता.

हाच विचार चर्च ऑफ द नॅझरीनच्या जागतिक सेवाकार्यांत कारणीभूत ठरला, जो पर्यंत कोणी ख्रिस्तविरहीत आहे तो पर्यंत आम्ही शांत बसू शकत नाही. आमचं मिशन धडाडीचं व कतृत्वाचं, सर्व राष्ट्रांत ख्रिस्तसदृष्य शिष्य तयार करण्यांचं आहे.

आम्ही देवाने पाठविलेले लोक आहोत, कृपेने प्राप्त झालेल्या गौरवी संपत्ती विषयी सर्वत्र सर्व लोकांस घोषणा करण्याकरीता कृपेमुळे निर्माण झालेल्या आशेमुळे, आम्ही आत्म्याच्या सामर्थ्याने ख्रिस्तासाठी जग जिंकावयाला जातो.

आम्ही पाठविलेले आहोत, हा आमचा अधिकार आहे, हे आमचं मिशन होय.

**<u>शेवट / आमंत्रण</u>**

जागतिक सेवाकार्याच्या १०० वर्षांच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीतून मिळालेल्या आत्मिक उपलब्धीच्या सहाय्याने चर्च ऑफ द नॅझरीन पुढील शतकाला तोंड देत आहे. आमच्याकडे ईश्वरी वतन, दैदिप्यमान इतिहास आणि जगतीक सेवा कार्य आहे.

उत्सव साजरा करण्यासाठी कारण : जगभर विश्वासुपणे सुवार्ता प्रसार कार्य करणाऱ्या सेवकांची सेवा हे आमच्याजवळ असलेले सबळ व पुरेसं कारण होय.

आमच्याकडे पवित्र शास्त्रावर आधारीत सिद्धांत आणि देवभिरु सेवकांनी विश्वासुपणे केलले आवाहनात्मक मार्गदर्शन आहे.

मंडळ्यांचे वाढतें नेटवर्क असं कौशल्यापूर्ण रीतीने तयार केलें आहे की ज्याद्वारे लाखो स्त्री पुरुष मुलंमुली ह्यांच्यापर्यंत जीवन बदलून टाकणारा ख्रिस्ताचा संदेश पोहचविता येईल. आमच्या जवळ असलेली वेस्लीप्रणीत पवित्रीकरण, सुवार्ताप्रसाराची परंपरा आहे. विश्वासणाऱ्यांना शिक्षण, शिष्यत्वाचा अनुभव ह्यांत अशा रीतीने वाढवायचे की ते देखील देवाच्या पवित्रीकरणाच्या सामर्थ्याचा अनुभव घेऊ शकतील.

पुढील शतक हे आमचं आहे. आम्ही फक्त उत्सव साजरा करणार नाही किंवा गेलेल्या संधी बद्दल दुःख करीत बसणार नाही. आमच्या हाती हा क्षण जगाला बदलण्यासाठी आहे, देवाच्या कृपेने व सहाय्याने पुढे देखील आम्ही निवडलेला वंश, राजकीय याजकगण, पवित्र राष्ट्र, देवाचे स्वतःचे लोक राहू व त्याची स्तुती स्तोत्रे आम्ही गाऊ ह्या करीता की त्याने आम्हाला अंधकारातून काढून प्रकाशात आणले (२:१)

ह्याच्या अगोदर मी तुम्हाला दोन प्रश्न विचारले होते. पहिला : येशू ख्रिस्त जो की तुमचा तारणारा आहे त्याच्याशी तुमचं नातं ?

**पुन्हा एका विचारतो :** तुम्हाला त्याची ओळख आहे का? त्याचं मुल होण्याचा विलक्षण अनुभव तुम्ही घेतला का ? पापक्षमा, त्याच्या कुटुंबात समावून घेतल्या जाणं, आणि येशूपासून प्राप्त होणारे जीवन ह्यांचा अनुभव घेतला कां? विश्वासणाऱ्यांकरिता दुसरा प्रश्न :

तुम्ही देवाच्या आत्म्याला तुमचं संपूर्ण पवित्रीकरण व्हावे म्हणून अंतःकरणांत प्रवेश दिला का? येशू ख्रिस्त हा आमच्या आत्म्याचा सर्वोत्तम मालक होय ह्यांचा अवर्णणीय अनुभव तुम्ही घेतला का?

त्याच्या सारखं तुम्ही व्हावं म्हणून तो वाट पाहत आहे. त्याच्या पवित्र प्रेमाने तुम्हाला भरण्याची त्याची इच्छा आहे. इतर सर्व गोष्टींचा नायनाट करुन तुमचे हृदय शुद्ध करावे अशी त्याची इच्छा आहे. तो तुम्हाला शुद्ध करु शकतो आता ह्या घटकेला .

तुम्ही त्याला तुमच्या अंतकरणांत प्रवेश करु द्याल का.? आजच्या पेक्षा उत्तम समय तो कोणता ?

जेसी सी मिडनडॉर्फ, प्रमुखाध्यक्ष